Indian Streams Research Journal
ISSN: 2230-7850 Impact Factor : 4.1625(UIF) Volume - 6 | Issue - 11 | December - 2016


# उत्तुंग प्रतिभेचा, तत्त्वज्ञकवी : वि. दा. सावरकर

**डॉ. संजय गोविंदराव पोहरकर**
प्राचार्य , समर्थ महाविद्यालय लाखनी, ता. लाखनी, जि. भंडारा (म.रा.)

## प्रस्तावना

भारताच्या स्वातंत्र्य लढ्यातील थोर स्वातंत्र्यसेनानी, क्रांतिकारकांचे मुकुटमणी विनायक दामोदरपंत सावरकर यांची संपूर्ण देशाला आणि जगातही 'स्वातंत्र्यवीर सावरकर' या विशेषणानेच प्रमुख ओळख आहे. परंतु साहित्यक्षेत्रातही ते तितकेच साहित्यवीर आहेत. त्यांचे संपूर्ण जीवन एक धगधगता यज्ञकुंड आहे. या यज्ञकुंडातून त्यांच्या जीवनातील कृतिशील तेजाने प्रदीप्त झालेल्या ज्वाला अजूनही अनेक विचारवंत अभ्यासकांच्या मनात धगधगत आहेत. भारताच्या राष्ट्रजीवनात विनायक दामोदरपंत सावरकर हे नाव वादळातील दीपस्तंभाप्रमाणे सदैव मार्गदर्शक आहे. स्वातंत्र्यलढ्याच्या अग्निदिव्यातून तावून सुलाखून निघालेले हे अस्सल सुवर्ण आहे. ह्या अस्सल सुवर्णाची झळाळी त्यांच्या साहित्यातूनही लखलखतांना दिसते. स्वातंत्र्य संग्रामातील हा लढवय्या वीर साहित्याच्या क्षेत्रातही तितकाच सिद्धहस्त प्रतिभासम्पन्न लेखक आहे; आणि महाकवीचे प्रतिभा सामर्थ्य लाभलेला कवी आहे. कवितेच्या क्षेत्रात स्वतःच्या वेगळ्या व्यक्तिमत्वामुळे मराठी काव्यनभांगणातील हा ध्रुवतारा आहे.

ते स्वतःसंबंधी म्हणत असत 'मी वृत्तीने कवी आणि कलावंत आहे पण परिस्थितीने मला राजकारणी पुरुष बनविले आहे।' कवित्व हा



त्यांच्या व्यक्तिमत्वाचा अभिन्न भाग आहे. अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत अंदमानाच्या कालकोठडीत शिक्षा भोगत असतांनाही त्यांची कवित्व वृत्ती सदैव जागी होती; त्यांची कविता ही जवळपास दहा हजार ओळींची आहे त्यापैकी ८ हजार ओळी ह्या अंदमानच्या कालकोठडीत, हातापायात बेड्या ठोकल्या असतांना जवळ कागद आणि लेखणी नसतांना सुरवातीला स्वतःच्या मनःपटलावर लिहिल्या गेल्या. नंतर तुरुंगाच्या भिंतीवर घायपाताच्या काट्याने तर कधी धारदार दगडाने कोरल्या गेल्या; सावरकरांची कविता जितकी प्रतिभा सम्पन्न आणि विलक्षण आहे, तितकाच त्यांच्या काव्यनिर्मितीचा इतिहासही विलक्षण आहे. महाकाव्याची बरोबरी करणारे त्यांचे 'कमला' काव्य म्हणजे मराठी काव्यनिर्मितीच्या प्रांतातील एक अद्भुतरम्य इतिहास आहे. नव्हे ते मराठी काव्यनिर्मितीच्या इतिहासातील 'सोनेरी पान' आहे.

सावरकरांच्या काव्यनिर्मितीच्या या ऐतिहासिक घटनेला धरुन कवी 'मनमोहन' यांनी 'ज्ञानेश्वरानंतर भिंत पुन्हा एकासाठी चालली' या शिर्षकाची कविता लिहिली. हातात लेखणी नाही, लिहायला कागद नाही आणि काव्यनिर्मितीची स्फूर्ती अनावर झाली; त्यावेळी सावरकरांच्या मनात प्रश्नांचा कल्लोळ निर्माण झाला. हातापायात बेड्यांनी बंदिस्त असलेला हा कवी आकाशाला प्रश्न विचारतो आकाशा माझा कागद होतोस काय रे? मग या प्रश्नाला उत्तर देतांना आकाश उपेक्षेने सावरकरांना काय म्हणाले याचे कल्पनारम्य चित्र रंगवितांना आकाश व कवी सावरकरांचा संवाद चित्रित करतांना कवी मनमोहन लिहितात —

''मी मुक्तामधले मुक्त – तू कैद्यांमधला कैदी ।
माझे नी तुझे व्हायाचे – ते सूर कसे संवादी ।।१।।
माझ्यावर लिहिती गीते – या मंदसमीरण लहरी ।
माझ्यावर चित्रित होते – गरुडाची गर्व भरारी ।।२।।
जड लंगर तुझीया पायी – पीस कसा होणार?
माझ्याहूनी आहे योग्य – भूमीला प्रश्न विचार ।।३।।

उच्चारण करण्या आधी – उच्चाटन शब्दा आले ।
आभाळ म्हणाले नाही – भूमीही म्हणाली 'नाही!'
मग विनायकाने त्यांची – आळवणी केली नाही ।।४।।

पापण्यात जळली लंका – लाह्यापरी आसू झाले ।
उच्चारुन होण्याआधी – उच्चाटन 'शब्दा' आले ।।५।।

दगडाची पार्थीव भिंत – मग पुढे अकल्पित सरली ।
मी कागद झाले आहे – चल लिही असे ती वदली ।।६।।''

तात्पर्य हेच की कवित्व हा सावरकरांच्या व्यक्तिमत्वाचा अभिन्न भाग होता. एका पृथगात्म व्यक्तिमत्वाच्या कवीची कविता म्हणून मराठी साहित्य विश्वात त्यांच्या कवितेचे स्वतंत्र व वेगळे असे स्थान आहे.

त्यांच्या प्रतिभेची झेप फार मोठी आहे. ती आपल्या सामर्थ्याने संपूर्ण ब्रह्मांडच कवेत घेते. यादृष्टीने त्यांची 'जगन्नाथाचा रथोत्सव' ही कविता विशेष उल्लेखनीय आहे. या सृष्टीत विश्वनियंत्या जगाचा नाथ अर्थात जगन्नाथ आपल्या रथातून फिरायला निघाले आहेत. या सृष्टीत जणू जगन्नाथाचा रथोत्सव

चालला आहे. विश्वनियंत्या जगन्नाथाची जणू मिरवणूक निघाली अशी कल्पना करुन संपूर्ण ब्रह्मांडच सावरकर आपल्या प्रतिभाविलासाने कसे नेमक्या शब्दांतून वर्णन करतात, ते खरोखरीच पाहण्याजोगे आहे. या कवितेत सावरकर विश्वनियंत्या जगन्नाथाला उद्देशून म्हणतात,

‘ऐश्वर्ये भारी । या अशा ऐश्वर्ये भारी
महाराज आपुली कथा ना कुठे निघे स्वारी ।।धृ.।।
दिक्क्षितिजांचा दैदीप्य रथ तुझा सुटता
ह्या कालपटाच्या अतूट उतरणीवरता
नक्षत्रकणांचा उठे धुराळा वरता
युगक्रोश दूरी । मागुती । युगक्रोश दूरी
महाराज आपुली कथा ना कुठे निघे स्वारी? ।।१।।

पुसूं नयेचि परी । पुसतसे । पुसूं नयेचि परी
मिरवणूक ही किमर्थ अथवा कुठे निघे स्वारी
दुज्या कुण्या द्वारीं । किंवा केवळ मिरवित येअी परत निजागारी
ह्या सूर्यशतांच्या किती मशाली जळती
मधुनीच शतावधी चंद्रजोति ह्या अुडती
सरसरत बाण हे धुमकेतूचे सुटती
कितिदा आणि तरी । हीहि तै । कितिदा आणि तरी
उठे चमकुनी रात्री पुरातन तिच्या अंधकारी ।।२।।

खरे तर ही संपूर्ण कविताच लक्षणीय आहे. सृष्टीचक्रात चालणारा हा नित्य खेळ सावरकरांनी नेमक्या शब्दात आपल्या कवेत घेतला आहे. उत्तुंग कल्पना विलासाबरोबरच सावरकरांच्या व्यक्तिमत्वातील अध्यात्मनिष्ठ तत्वचिंतकही इथे कलापूर्णतेने प्रगट झालेला दिसतो. सावरकरांच्या कवितेवर भाष्य करतांना सावरकरांचे चरित्रकार धनंजय कीर म्हणतात, ‘‘कृती शूरत्व, समृद्ध अनुभव, विशाल कल्पकता, उदात्त भावना, नि महान व्यक्तिमत्व हे सारे गुण त्यांच्या कवितेत उतरले आहेत. त्यांचे विचार रसरशीत आणि शब्द दाहक असतात. स्वतःच एका महाकाव्याचा विषय असलेल्या सावरकरांनी महाकाव्य निर्माण केले आहे !’’

सावरकरांनी वयाच्या अकराव्या वर्षी ‘श्रीमंत सवाअी माधवरावांचा रंग’ ही कविता रचली. त्यांची स्फूट कविता व दीर्घ कविताही बरीच आहे. अगदी बाळपणीच आपण महाकाव्य लिहावे हा विचार त्यांच्या मनात येवून गेला. ते आपल्या माझी जन्मठेप ह्या आत्मचरित्रात लिहीतात, ‘‘अगदी लहानपणी एक इच्छा असे की, आपण मराठीत एक महाकाव्य लिहावे. कोणते, काय, कसे इतकेच नव्हे तर महाकाव्य म्हणजे नक्की काय? हेही निश्चित कळत नसे पण लिहावयाचे हा निश्चय.’’

पुढे चालून सावरकरांनी ‘कमला’ काव्याच्या निर्मितीने आपली ही इच्छा अल्पांशाने पूर्ण केली. सावरकरांनी समग्र असे कोणतेही एक महाकाव्य रचले नाही. पण त्यांचे पानपताच्या युद्धावर आधरलेले ‘कमला’ हे खंड काव्य महाकाव्याच्या प्रचलित कसोट्या पूर्ण करु शकणारे काव्य कसे आहे हे मी माझ्या सावरकर काव्यमीमांसा या ग्रंथात सप्रमाण सिद्ध केले आहे.

कवी सावरकरांचा प्रतिभाविलास

सावरकर हे उत्तुंग कल्पना विलास सामर्थ्य लाभलेले अतिशय श्रेष्ठ दर्जाचे कवी होते. याचा एक सुंदर व नितांत रमणीय असा नमुना म्हणजे त्यांची तारकांस पाहून ही कविता होय. सावरकर १९०६ साली मुंबअी सोडून जहाजाने विलायतेस जाण्यास निघाले. समुद्र प्रवासात करमणूक म्हणून ते वादळी व निरभ्र रात्री बोटीच्या माथ्यावर फिरत. त्याप्रसंगी त्यांना आकाशातील तारकांचे जे दर्शन घडले त्याला अनुसरुन सावरकरांनी ही दीर्घ कविता रचली. दृष्टीच्या टप्प्यात सर्वदूर तारकांचे प्रतिबिंब पडलेला समुद्र आणि वर आकाशातही तेच दृश्य. हे दृश्य पाहून सावरकर म्हणतात,

सुनील नभ हे, सुंदर नभ हे, नभ हे अतल अहा
सुनील सागर, सुंदर सागर, सागर अतलचि हा
नक्षत्रांहि तारांकित हें नभ चम चम हासें
प्रतिबिंबाही तसा सागरहि तारांकित भासे
नुमजे लागे, कुठे नभ कुठे, जलसीमा होअी

नभात जल ते, जलात नभ ते संगमुनी जाओ
खरा कोणता सागर यांतुनि, वरती की खाली
खरे तसे आकाश कोणते गुंग मती झाली
आकाशीचे तारे सागरि, प्रतिबिंबित होती
किंवा आकाशी हे बिंबती सागरीचे मोती
किंवा आकाशची हे सगळे, की सागर सगळा
भवसागर बोलती पुराणी प्रथित ऋषी ज्याला!?

अगदीच सुरवातीलाच कल्पनारम्य तत्वविलासाची विलक्षण चुणूक या कवितेत जाणवते व ही कविता हळुवार फुलत जाते. आकाशातील तारे हे तारे नसून, सूर आणि असुरांमध्ये समुद्रमंथनाच्या वेळी अमृत कलश वर येतांना जी ओढाताण झाली त्या ओढाताणीत जे अमृत बिंदू गळले त्यांनाच ज्योतिषी आणि भले भले लोक तारे म्हणून चकले. किंवा अप्सरा 'ह्या' स्वर्गातून पृथ्वीवर खाली रांगून पाहू लागल्या तेव्हा त्यांना पृथ्विवर जाई, जुई, मोगरा आणि मालतीची फुले फुललेली दिसली व त्यांनाही त्यांच्या नंदनवनात अशी काम्य फुले असावी अशी तीव्र इच्छा झाली आणि त्यासाठी आकाशामध्ये आपले गोड हास्यच पेरुन दिले. हे हास्य अंकुरले त्याची वेल वाढली व बहरली. त्या हास्यलतेला आलेल्या फुलांनाच तारका समजून ज्योतिषी आणि भलेभले लोक तारे समजून चकले !

सावरकरांना कल्पना विलासात श्रृंगाराचेही वावडे नाही. यांचा सुंदर नमुना म्हणजे याच कवितेतील पुढील काव्यपंक्ती विशेष लक्षणीय आहेत.

''सुवर्ण–गौरा–गौरी श्रीहर लीलारत झाले
थाप पडे तो द्वारीं श्रीहरि भेटाया आले
नग्ना लगबग गिरिजा धावे सावरु शालूला
हिसका बसूनी हार गळ्यातील तटकन् तो तुटला
त्या हारांतील मोती सैरावैरा ओघळले
तयांचि तारे म्हणुनि ज्योतिषी भले भले चकले''।

जिज्ञासूंनी ही कविता समग्रपणे वाचून काव्यानंद घ्यावा अशी आहे. सावरकर जर स्वतंत्र भारताचे नागरिक म्हणून जन्माला आले असते तर त्यांची कविता कोणत्या वळणाची आणि कोणत्या वैशिष्ट्यांनी नटलेली राहिली असती याचा अंदाज जगन्नाथाचा रथोत्सव, तारकांस पाहून; कमला यासारख्या काव्यरचनेतून बांधता येतो. परंतु सावरकर राष्ट्रीय कर्तव्याचे नित्यजागृत भान असलेले विचारवंत तत्वज्ञ कवी होते. निसर्गाने दिलेल्या विलक्षण काव्यप्रतिभेला भारताच्या राष्ट्रीय स्वातंत्र्याचे साधन म्हणून त्यांनी वापरले. आपल्या जीवन व्यवहारात त्यांनी ठरवून, नित्यधर्म आणि आपद्धर्म ह्यात भेद केला होता. आपण पारतंत्र्यात जन्माला आलो. अर्थात आपली भारतमाता पारतंत्र्यात आहे अशा परिस्थितीत आपल्या कवी म्हणून नित्यधर्माला त्यांनी मुरड घातली व कवित्व शक्तीला भारताच्या स्वातंत्र्य लढ्यातील विचार प्रसाराचे साधन म्हणून राबविले. यादृष्टीने त्यांची रवींद्रनाथांचे अभिनंदन ही कविता लक्षात घेतली पाहिजे. १९१३ साली सावरकर अंदमानच्या तुरुंगात शिक्षा भोगत असतांना रवींद्रनाथ टागोरांना १९१३ सालचे श्रेष्ठ वाङ्मयासाठी दिले जाणारे नोबेल पारितोषिके मिळाले. हे अैकून तुरुंगात शिक्षा भोगणाऱ्या सावरकरांना अत्यंत आनंद झाला. या कवितेत सावरकर म्हणतात–

'कविकक्ष पूर्ण हा माझा
परि उणीव तेथे जा जा'

कविकक्षा हा पूर्णपणे माझा आहे. परंतु भारताच्या स्वातंत्र्य समरात लढा देणाऱ्यांची उणीव मला जाणवली म्हणून मी तेथे गेलो आहे. रवींद्रनाथाच्या या यज्ञाबद्दल तुरुंगातील बद्धकरांनीच ते रवींद्रनाथांचे अभीनंदन करतात.

'निजदास्यमोचना माता
बद्धांजलि मधली हाता
ती कळी दीप्त दहनी त्या । अर्पिते'

सावरकरांची कविता ही आपद्धर्म म्हणून भारताच्या स्वातंत्र्य संग्रामासाठी समर्पित झालेली तेजस्वी कविता आहे. त्यांचे तत्वज्ञान इथे काव्यरुप धारण करते. त्यांनी अगदी वयाच्या १९ व्या वर्षी रचलेले 'स्वतंत्रतेचे स्तोत्र' म्हणजे गुलामगिरीचे जीवन जगणाऱ्या जगातील सर्वच परतंत्र राष्ट्र

ासाठी मुक्ति लढ्याची प्रेरणा देणारे प्रेरणागीत आहे. खरे तर ते संपूर्ण विश्वाचे ते प्रेरणागान आहे. मनुष्याच्या मनुष्य म्हणून सन्मानासाठी, प्रतिष्ठेसाठी आणि विकासासाठी 'स्वातंत्र्य' ही आद्य गरज आहे असे सावरकरांना वाटते. म्हणून स्वतंत्रतेला देवता संबोधून स्वतंत्रता देवतेला ते साक्षात सूर्याचे तेज मानतात, समुद्राचे गांभीर्य मानतात. अेवढेच काय ऋषी मुनींनी वेदांतात मांडलेली मुक्तीची आणि परब्रह्माची कल्पनाही सावरकरांना स्वातंत्र्याचेच रुप वाटते. 'मोक्ष मुक्ती ही तुझीच रुपे, तुलाच वेदान्ती । स्वतंत्रते भगवती योगीजन परबह्म वदती ।' इथे कवीचा कल्पना विलास तत्वरुप झाला आहे. स्वातंत्र्य लढ्यासाठी लोकांना प्रेरित करण्याचा प्रचारकी अभीनिवेश यात आहे पण या अभिनिवेशाने कवितेचे सौंदर्य बाधित न होता ते अधिक मोहकतेने खुलले आहे हे विशेष. खरे तर 'स्वतंत्रतेचे स्तोत्र' ह्या कवितेत सावरकरांनी आपल्या विचारांचे सार सर्वस्व ओतले आहे.

महाकवीचे प्रतिभा सामर्थ्य (उदा. कमला)

सावरकरांना ''महाकाव्य न लिहिणारे महाकवी'' असे संबोधले जाते. सावरकर साहित्याचा अभ्यास करणाऱ्या साहित्यिकांनी सावरकरांना 'महाकवी' संबोधले आहे. वास्तविक सावरकरांचे जीवन हाच एक महाकाव्याचा विषय आहे. श्री. गो. गो. अधिकारी यांनी सावरकरांच्या जीवनावर महाकाव्य लिहिलेही आहे. महाकवी सावरकर हा सावरकरांच्या व्यक्तिमत्वातील एक महत्वपूर्ण पैली आहे. त्यांच्या ह्या कवित्वशक्तिवर भाष्य करतांना ग. त्र्यं. माडखोलकर म्हणतात, ''कालिदासाशी स्पर्धा करणारे उपमा कौशल्य, मोगलाचे सिंहासन फोडणाऱ्या मराठी भाल्याचे लखलखित तेज आणि संतकवींचे भावमाधुर्य हे गुण सावरकरांच्या कवितेत एकवटले असल्यामुळे मराठी कविमालिकेत सावरकरांना अग्रस्थान दिले पाहिजे.'' डॉ. के. ना. वाटवे म्हणतात, ''सावरकर हे तांत्रिक व तात्विक ह्या दोन्ही गमकांची दृष्टी लक्षात घेता महाकवीच होत.'' तर प्र. के. अत्रे म्हणतात, ''प्रत्यक्ष कालिदास''च मराठीत अवतरल्याचा भास व्हावा, इतकी उपमांची सुंदर पखरण नि शृंगाराची मनोहर खुलावट 'कमला' काव्यात साधलेली आहे. वरील अभिप्रायांव्यतीरिक्त डॉ. ज. घु. नाईकवाडे, डॉ. द. भि. कुळकर्णी, साहित्याचार्य वेदांततीर्थ बाळशास्त्री हरदास इत्यादी अनेक मान्यवर समीक्षकांनी सावरकर हे महाकवी होते यावर शिक्कामोर्तब केले आहे.

एक नमुना म्हणून सावरकरांच्या पानपताच्या युद्धावर आधारलेल्या संकल्पित महाकाव्याच्या 'कमला' ह्या खंडकाव्याचे घेता येईल. ह्या खंडकाव्याच्या सुरवातीला फुल बागेचे वर्णन येते. त्या वर्णनात फुलबागेच्या प्रवेशद्वारावर 'जाईची मांडवी' व जाईला आलेली फुले याचे वर्णन येते. या वर्णनातील सावरकरांचा कल्पना विलास किती अद्भूत आहे हे पाहण्याजोगे आहे.

''मांडवी ही प्रवेशाची जाईने विणिली जिला,
फुले ही हसरी येत्या आदरीती पलोचला
फुले? अहा फुले ना ती, उद्याची विहरावया
रात्रीत चोरुनी येता, अप्सरा धरिले जया,
नोंद त्या दिव्य पाप्यांची ठेवू जाईवरी असे
चुंबनाचेची त्यांच्या घे देवी द्वारप हे ठसे !''

अर्थात, प्रवेशद्वारावरील दिसणारी जाईची फुले हे जाईची फुले नसून, रात्रीच्या वेळी स्वर्गातील अप्सरा लपून चोरुन ह्या उद्यानात विहार करण्यासाठी आल्या होत्या व त्या अप्सरा उद्यानाच्या द्वारपालाने पकडल्या व त्या अप्सरांनी केलेल्या दिव्य पापाची शिक्षा म्हणून द्वारापालाने जाईच्या वेलींची त्यांनी चुंबने घेतली होती त्या चुंबनाचे ठसे त्यांना तसेच ठेवायला लावले. व हे त्यांच्या चुंबनाचे ठसे म्हणजेच जाईच्या मांडवीला लागलेली फुले होत. सावरकरांनी केलेले हे अद्भूतरम्य वर्णन खरोखरच बुद्धीला थक्क करणारे आहे.

त्यांच्या ह्या अद्भूतरम्य कल्पना विलासाने मनोहारी शृंगाराचाही रसपरिपूर्ण असा मजेदार पल्ला गाठला आहे. सावरकर ह्याच फुलबागेचे वर्णन करीत असतांना फुलबागेत ह्या फुलावरुन त्या फुलावर घिरट्या मारीत फिरणाऱ्या भुंग्यांचे वर्णन करतांना भुंग्याला प्रेमदूत बनवितात. जणू या फुलांचा प्रेमसंदेश भुंगा दुसऱ्या फुलापर्यंत पोहचवितो. व जणू एका फुलाकडून वशीकरण चूर्ण घेवून दुसऱ्या फुलीला (फुलांमधील नर मादी ही कल्पना) पोहचवतो असे वर्णन करतात,

''वशिकरण चूर्णासी देत त्यास तिला हरुं
मंत्रगुंजत त्या भोग क्षमा कलिका करु
ह्या पुष्पा वश त्या पुष्पी करवीत परोपरी
हिचे चुंबन दे त्यांसी, त्याचे देत हिला अली
दयिता दयितांमाजी सुमलोकातल्या पहा
घाली खेपा मधावारी मदनाचा दलाल हा!''

अशा एकाहून एक सरस अशा कल्पनारम्य सरस स्थळांची कितीतरी उदाहरणे ह्या कमलाकाव्यात पाहावयास मिळतात.

सावरकरांच्या कवितेचे स्वरुप हे विविधांगी असून त्यांत संस्कृतप्रचूरतेचा दोष आहे असे मानले जाते आणि ते बऱ्याच अंशी खरेही आहे. परंतु त्यांना राष्ट्रीय स्वातंत्र्यलढ्याच्या दृष्टीने जनतेला प्रेरित करावे ह्या प्रचारकी हेतूने रचलेली कविता सुलभही आहे. परंतु अशा कविताही संस्कृतच्या प्रभावातून अलिप्त राहिलेल्या नाहीत. प्रचारकी तत्वबोधाच्या दृष्टीने त्यांची सायंकाळी रानात एकटेच चुकलेले कोकरु, वृषोक्ती, श्री. शिवाजी महाराजांची आरती, स्वतंत्रतेचे स्तोत्र, सिंहगडचा पोवाडा, श्रीबाजी देशपांडे यांचा पोवाडा, प्रियकर हिंदुस्थान माझे मृत्यूपत्र, आत्मबल, पहिला हप्ता, शस्त्रगीत, दिपवाळीचे लक्ष्मीपूजन ह्या कविता विशेष लक्षणीय आहेत.

तसेच सप्तर्षी, महासागर, विरच्छोवास, गोमांतक ही खंडकाव्येही व 'आकांशा', 'मूर्तीदूजी ती' ह्या दीर्घ कविता वाचनीय आहेत.

एक वेगळे जीवन जगलेला, क्रांतिकारकांचा मुकुटमणी, कृतिशीर लढवय्या वीराची कविता म्हणून सावरकरांच्या कवितेचे मराठी काव्यविश्वातील स्थान उत्तर दिशेला स्थीर झालेल्या ध्रुवताऱ्यासारखे आहे.

## निष्कर्ष :–

१.सावरकरांची कविता ही भारताच्या स्वातंत्र्यलढ्यातील कृतिशील लढवय्या स्वातंत्र्यवीराची कविता आहे.

२.सावरकरांचे व्यक्तिमत्व हे ऐतिहासिक व्यक्तिमत्व असून त्यांच्या काव्यनिर्मितीचा इतिहासही अत्यंत रोमांचक आहे.

३.सावरकरांनी जसा स्वातंत्र्यलढ्याच्या आंदोलनात इतिहास घडविला अगदी तसाच इतिहास तुरुंगाच्या भिंतीवर घायपाताच्या काट्याने काव्यलेखन करुन घडविला.

४.सावरकर हे महावीची प्रतिभा लाभलेले परंतु सलग अशा कोणत्याही महाकाव्याची निर्मिती करु न शकलेले महाकवी आहेत.

५.महाकाव्याच्या विविध निकषांवर त्यांची कमला, गोमांतक, सप्तर्षी ही खंडकाव्ये उतरतात.

६.महाकवीचे प्रतिभा सामर्थ्य त्यांच्या खंडकाव्यात आणि दीर्घ कवितांमध्ये स्पष्टपणे महाकवीच्या उत्तुंग कल्पनाविलासाचे दर्शन घडते. म्हणून सावरकर हे महाकवीचे प्रतिभा सामर्थ्य लाभलेले कवी आहेत.

७.सावरकरांच्या कवितेत त्यांच्या क्रांतिकारी व्यक्तिमत्वाइतकेच प्रतिभासम्पन्न भाषाप्रभू महाकवी सावरकरांचे दर्शन घडते.

८.कार्यप्रेरकता, प्रचारकी अभिनीवेषासोबतच त्यांच्या ऐतिहासिक राजकीय उत्तुंग कर्तुत्वासोबतच उत्तुंग कल्पना विलास करु शकणारे प्रतिभासामर्थ्य हे त्यांच्या कवितेचे ठळक वैशिष्ट होय.

९. त्यांच्या व्यक्तिमत्वातील तत्ववेत्तेपण त्यांच्या कवितेत काव्यसौंदर्याचे स्वरुप धारण करुन प्रगट होतांना दिसते.

१०.सावरकरांच्या कवितेत अद्भूतरम्य अशा श्रृंगाररसाचेही मनोहारी दर्शन घडते.

११.राष्ट्रीय कर्तव्याचे नित्य जागृत भान असलेला तत्वज्ञ कवी म्हणून सावरकरांचे मराठी कवितेत स्वतंत्र स्थान आहे.

## संदर्भ :–

१. समग्र सावरकर, संपादक खंड १ ला व खंड ७ वा, श्री. शांताराम (बाळाराव) शिवराम सावरकर, साकेत प्रकाशन, गांधीनगर, औरंगाबाद; प्रथम आवृत्ती सन १९९३.

२. स्वातंत्र्यवीर सावरकर काव्यमीमांसा, डॉ. संजय पोहरकर, अक्षय प्रकाशन, शनिवार पेठ, पुणे; प्रथम आवृत्ती डिसेंबर १९९९.



**डॉ. संजय गोविंदराव पोहरकर**

**प्राचार्य , समर्थ महाविद्यालय लाखनी, ता. लाखनी, जि. भंडारा (म.रा.)**